**अनंत अमृत स्मरण**

**प्रकाशक** : चंद्रशेखर रामराय केळकर
घर नं. ८२७, 'श्रीराम निकेतन',
श्रीबापूरावजी केळकर वाडा, गांवभाग,
सांगली – ४१६ ४१६.
दूरभाष : (०२३३) २३३२४६३

**प्रथम आवृत्ती** : २००९

**प्रकाशन दिन** : शनिवार दि. ०४/०७/२००९
आषाढ शुद्ध द्वादशी शके १९३१
श्री. अनंत गंगाधर केळकर
अमृत महोत्सवी पुण्यतिथी

सर्व हक्क प्रकाशकाधीन

**मुद्रक** : अनिल अजित लोखंडे
'श्रीदासराम ऑफसेट', सांगली.
फोन : ०२३३-२३२२७२९

।। श्रीगुरुलिंगजंगम प्रसन्न ।।

**श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प – १०**

# अनंत अमृत स्मरण

**श्री. प्रसन्न पांडुरंग गोखले**

♦ प्रकाशक ♦
**चंद्रशेखर रामराय केळकर**

आवृत्ती पहिली सांगली इ.स. २००९

।। श्रीराम ।।

# माझ्या मनीचा भाव

माझे पणजोबा ती.प.पू. श्री. अनंत गंगाधर केळकर यांची ७५ वी पुण्यतिथी शनिवार दिनांक ४/७/२००९ ला येत आहे. माझे आजोबा ती.प.पू.श्री.मामामहाराज केळकर कीर्तनात सांगत असत, 'माझ्या वडिलांनी म्हणजे श्री. नानांनी एवढे मोठे घर बांधून ठेवले म्हणून मला कीर्तन करता आले. लहान जागेत काय कीर्तन करू शकलो असतो?' तेंव्हा त्यांचे उपकार अनंत आहेत. यादृष्टीने त्यांची ७५वी अमृत महोत्सवी पुण्यतिथी साजरी करावी असा विचार मनात आला. आणि हा विचार आमचे घरातील सर्वांनी उचलून धरला. म्हणून हा कार्यक्रम अत्यंत थाटात पण घरगुती आणि घरगुती पण थाटात असा संपन्न होत आहे.

ती.प.पू.श्री.अनंत गंगाधर केळकर यांना भगवान श्री सद्गुरु श्री तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचा अनुग्रह होता. तात्यासाहेब महाराजांनी आपल्या कृपेने अनंताला अनंतची केले असे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी वेदशास्त्रसंपन्न श्री लक्ष्मणशास्त्री दीक्षित (नातू) यांचेकडून श्री शंकरांची पार्थीव पूजा घेतली होती व ती त्यांनी अखेर पर्यंत केली. ॐ नमःशिवाय या महामंत्राचा रोज १२००० जप करीत. श्री लक्ष्मणशास्त्री दीक्षित यांची समाधी त्यांनी सांगलीत विष्णु घाटावर बांधली व त्यामध्ये त्यांनी सुंदर अशा मोहक संगमरवरी पादुका प्रस्थापित केल्या. व त्यांची ते पूजा अर्चा नित्यशः करीत. श्री लक्ष्मणशास्त्री दीक्षित हे वयस्कर झाल्यानंतर त्यांच्या पायातील शक्ती गेली होती. तेव्हा आमचे पणजोबा त्यांना पाठीवर घेऊन कृष्णाबाईचे स्नान घालून त्यांची संध्या वगैरे झाल्यानंतर त्यांना घरी नेत असत. अशी त्यांनी त्यांची सेवा केली. तसेच माझ्या पणजी श्री. लक्ष्मीबाई लक्ष्मी सारख्याच होत्या. त्यांना ब्रह्मचैतन्यमहाराजांचा अनुग्रह होता. त्यामुळे त्या वरचेवर गोंदवल्याला जात असत. माझे पणजोबाही त्यांचेबरोबर गोंदवल्याला जात. ते अत्यंत कष्टाळू होते. तेथे सेवा फार करायचे श्री महाराजांचे त्यांचेवर निरतीशय प्रेम होते.

आमच्या पणजोबांच्या - श्री नानांच्या या अमृत महोत्सवी पुण्यतिथीच्या निमित्ताने वरील तीनही महात्म्यांच्या वंशजाना बोलावून त्यांचा आदर करावा असे मनामध्ये आले. त्याप्रमाणे ती.प.पू.श्री.गुरुनाथमहाराज कोटणीस व प.पू.सौ. उषाताई गुरुनाथ कोटणीस, प.पू. वेदशास्त्रसंपन्न रामचंद्र शास्त्री दीक्षित (नातू) व प.पू. सौ.सीताबाई रामचंद्र शास्त्री दीक्षित (नातू) आणि प.पू.श्री. गुरुनाथजी सीताराम कुलकर्णी व प.पू.सौ.प्रज्ञा गुरुनाथ कुलकर्णी यांना पाचारण करणेत आले आहे. या महात्म्यांचे चरणी अनेक प्रणिपात. या शिवाय ॐ नमः शिवाय या तारक मंत्राचा सहा माळा जप किमान ७५ लोकांनी करावा असे नियोजन करणेत आले.

आमच्या या ती.प.पू. अनंत गंगाधर केळकर यांचे उत्कृष्ठ असे ओवीबध्द चरित्र आमचेच श्री प्रसन्न गोखले यांनी लिहिले आहे. ते यासोबत दिले आहे. त्याचे पठणही या अमृत महोत्सवी पुण्यतिथीच्या निमित्ताने होत आहे.

एकूण सगळाच कार्यक्रम आमचे कुलदैवत श्री रामेश्वर

व श्री सद्गुरू परंपरेच्या कृपेने उत्कृष्ठ साजरा होणार यात संदेह नाही.

माझे पितृदेव ती.प.पू. श्री दादामहाराज केळकर यांनी यापूर्वी 'ती.प.पू.कै. अनंत गंगाधर केळकर कृत पद्यावली' असे एक पुस्तक १९७३ मध्ये प्रकाशित केले होते. ते या पुस्तकात पुढे समाविष्ट केले आहे. सगळे पुस्तक वाचल्यानंतरच ती.प.पू. श्री नानांच्या श्री सद्गुरूंवरील किंवा श्री संतांच्यावरील निष्ठेची कल्पना येईल. अशीच निष्ठा आमचे घराण्यात उत्तरोत्तर वाढत जावी, सेवा घडावी अशी शतशः प्रार्थना भगवान श्री सद्गुरू श्री निंबरगीकरमहाराज यांचे चरणी करीत आहे.

शेवटी भगवान श्री सद्गुरु श्री तात्यासाहेबमहाराज कोटणीस, माझे आजोबा ती.प.पू. श्री मामामहाराज केळकर व माझे पितृदेव ती.प.पू. श्री दादामहाराज केळकर, श्री सद्गुरु परंपरा व आमच्या श्री कुलदेवतांना अनेक प्रणिपात करून येथेच थांबतो.

सदरचे हे पुस्तक छपाईचे काम आमचे श्री दासराम ऑफसेटचे श्री अनिल लोखंडे यांनी अत्यंत उत्कृष्ठ असे केले आहे. त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत.

**।। राजाधिराज श्री सद्गुरुनाथ महाराज की जय ।।**

सांगली
दिनांक : ४-७-२००९

श्री दादांचा कृपाभिलाषी,
***चंद्रशेखर***
(चंद्रशेखर रामराय केळकर)

।। श्रीराम ।।

।। राजाधिराज सद्गुरुनाथ महाराज की जय ।।

## ती.प.पू.कै. अनंतरावजी गंगाधर केळकर यांचे ७५ वे पुण्यतिथीच्या निमित्ताने लिहिलेले

# * श्री अनंत अमृत स्मरण *

श्री दासराम माऊली । देशी भक्तांसी साऊली ।
आम्ही अनुभवितो आपुली । सत्ता पदोपदी ।।१।।

आम्ही सारे भाग्यवान । म्हणोन दिसले आपुले चरण ।
असोद्याजी आशिर्वचन । सदैव आपुले ।।२।।

आपुले कुळ पावन । त्याचे करावे स्मरण ।
म्हणोन हे प्रार्थितो जाण । कृपा करी गा दयाळा ।।३।।

एक एक महान अवतार । झाले केळकरकुली साचार ।
परंपरा दिसे थोर । दुर्लभ या कलीयुगी ।।४।।

बीज गोड फळ गोड । सूत्र चालले अजोड ।
उपासना निर्दंभ अखंड । सुखस्वार्थासाठी ।। ५।।

कृष्णातीरानजीक । सांगलीत वाडा एक ।
श्री गंगाधररावजी स्थायीक । झाले सुखेनैव ।।६।।

## अभंग

नमो रामेश्वरा नमोजी सोमेशा ।।
रेवणसिद्धेशा मरुळसिद्धा ।।१।।

नमो काडसिद्धा गुरुलिंगजंगमा ।।
रघुनाथप्रिया रामराया ।।२।।

नमो हनुमंता गुरु नारायणा ।।
मती द्या कीर्तना **गोविंदा** या ।।३।।

श्री गंगाधर पार्वती । सुशील माता पित्याचे पोटी ।
अनंतरावजी भूवरी येती । कृपा शिवशंकराची ।।७।।

अनंतरावजी केळकर । श्री गोविंदजींचे पितृवर ।
आम्हावरी बहु उपकार । ज्यांनी केले ।।८।।

सत्वशील आचारशील । ज्ञानशील शिस्तशील ।
मातृभक्ती अती सोज्वळ । ऐसे अनंतरावजी ।।९।।

फायनलपर्यंत शिक्षण घेतले । सरकारी सेवारत झाले ।
परमार्थीही रंगून गेले । निष्ठा श्रीशिवशंकरावरी ।।१०।।

हिशोबात मात्र खबरदार । कोणाचा एक आणाही न घेणार ।
कोणास जास्त न सोडणार । वागणे कटाक्षाचे ।।११।।

एकाचा आणा द्यायचा राहिला । चुटपूट लागली मनाला ।
आण्याचे तिकीट पाठविले त्याला । केले समाधान आपुले ।।१२।।

ऐसे असूनही । दान करण्यात आग्रही ।
वारंवार दानधर्मही । भरपूर केला ।।१३।।

रंजल्या गांजलेल्यांना बोलवावे । प्रेमाने स्वागत करावे ।
अन्नदान करून तृप्त करावे । त्या सर्वांसी ।।१४।।

ऐसा कोमल स्वभाव । घेई अंतःकरणाचा ठाव ।
करिती काही काळ वैश्वदेव । सात्विकवृत्तीने ।।१५।।





लक्ष्मणरावजी दीक्षित । होते एक थोर संत ।
निष्ठावान शिवभक्त । सांगलीत रहाती ।।१६।।

अनंतरावजींनी त्यांचेकडून । पार्थिवपूजा घेतली जाण ।
केले आमरणान्त पूजन । अतीव निष्ठेने ।।१७।।

कठोरव्रत चालवले । शिवशंकरासी तोषविले ।
तन मन धन अर्पिले । शिवशंकरापायी ।।१८।।

देता नेता पाळिता । पोशिता रक्षिता संहारिता ।
एकचि शिवशंकर प्रणेता । अखिल जगीचा ।।१९।।

निष्ठा तेथे आनंदी मन । निष्ठा तेथे समाधान ।
निष्ठा तेथे भगवान । नित्य प्रत्यया येई ।।२०।।

भोळा एक शिवशंकर । ऐसा करोनी विचार ।
भिस्त ठेवून त्यावर । निश्चिंत राहिले ।।२१।।

अनंतरावजींची शिवभक्ती । तैसीच थोर मातृभक्ती ।
याची आता प्रचीती । पहा पुढे ।।२२।।

आईस आवडे भात फार । याचा करून विचार ।
कलखांब नजीक शहापूर । घेतली भातशेती ।।२३।।

याच शहापूरात साचार । झाला श्रीमामांचा अवतार ।
आनंदास नुरे पारावार । हसतमुख बाळ पहाता ।।२४।।

जन्म झाला गोठ्यात । म्हणोन गोविंद नाव ठेवत ।
दाहीदिशा उजळत । रामभक्त प्रगटता ।।२५।।

तसेच स्मरणार्थ मोतीश्रींच्या । केला जीर्णोद्धार विहिरीचा ।
लेख असे कायमचा । कोरलेला* त्या ठिकाणी ।।२६।।

* ती.गं.भा. मातोश्री श्री पार्वतीबाई केळकर यांनी मी अल्पवई असता कष्ट सोसून विपत्तीकाळी माझे संरक्षण केले. या निरुपम प्रेमाचे अखंड स्मरणार्थ या विहीरीचा जीर्णोद्धार केला असे.

**अनंत गंगाधर केळकर**

माघ व ४ शके १८१३, सांगली.

रहात्या वाड्यात सुंदर । बांधले घर मनोहर ।
शांत एकांत मधुर । परमार्थासाठी ।।२७।।

घर प्रशस्त उभारिले । भक्तीने डोलत राहिले ।
उपासना नित्य चाले । या घरातून ।।२८।।

नानांनी बांधले घर । सोय केली अपरंपार ।
म्हणोनीच होतो कीर्तनगजर । वदती मामा ।।२९।।

अनंतरावजींनी पाया रचला । श्री मामांनी उभारले देवालयाला ।
श्रीदादांनी सुखे डोलविला । कळस श्रीराममंदिराचा ।।३०।।





चढता वाढता भक्तीचा आलेख । पाहूनी संतांसी हरीख ।
आशिर्वचन देती अनेक । अध्वर्यू अनेक पीठांचे ।।३१।।

शुद्ध बीजापोटी । फळे रसाळ गोमटी ।
संतमालिका भक्तांसाठी । प्रगटे जणू ।।३२।।

श्रेष्ठ आचार श्रेष्ठ विचार । संतांचा विशेष आदर ।
मिळे प्रेम अनिवार । अनंतरावजींना ।।३३।।

अध्यात्मप्राप्तीसाठी । संतमहंतांची व्हावी भेटी ।
तरीच लाभ उठाउठी । होतो आपणा ।।३४।।

तात्यासाहेब कोटणीसमहाराज । परमार्थ साधिती सहज ।
अनंतरावजींचे साधले काज । पूर्व सुकृत म्हणोनी ।।३५।।

मार्गदर्शन कोटणीसमहाराजांचे । मन धाले अनंतरावजींचे ।
मार्ग परमार्थप्राप्तीचे । झाले स्पष्ट ।।३६।।

तात्यासाहेबमहाराजांचे नित्यकीर्तनी । जाती अनंतरावजी रंगूनी ।
साथ समयोचीत आनंद मनी । काय वर्णावा ।।३७।।

ब्रह्म ब्रह्माचे वर्णन करणार । ऐसा कीर्तनगजर ।
श्रोता पावे परपार । क्षण न लागता ।।३८।।

कोटणीसमहाराज फर्मास करिती । अनंतरावजी भाग्य मानिती ।
'मौज दिसती रे' पद म्हणती । विसरून देहभाव ।।३९।।

'मौजेचे' पद म्हणता । मौजच होई सभोवता ।
ऐसे प्रेम वर्णिता । सांगा कैसे येईल ।।४०।।

अशा अनेक संतांची भेटी । होता होय स्वानंदाची पुष्टी ।
अनंतरावजींची भाग्याची पेटी । हीच असे थोर ।। ४१ ।।

प.पू. टेंबे स्वामींचे । दीक्षितस्वामी परमअधिकाराचे ।
या दोनही संतांच्या आशिर्वादाचे । ओघ आले अनंतरावजींकडे ।।४२।।

दोन्ही महात्म्यांचे हातचा । एक एक रुपाया मोलाचा ।
ठेवा पुनितस्पर्शाचा । लाभला अनंतरावजींना ।।४३।।

श्रीमामांनी देह ठेविल्यावरी । टेंबेस्वामींचे शिष्य अधिकारी ।
गुळवणीमहाराज मंदिरी । आले श्रीमामांच्या ।।४४।।

हे दोन्ही रुपये दाखविल्यावर । गुळवणी महाराज करिती नमस्कार ।
नेत्रातून अश्रू अपार । वाहती बराच वेळ ।।४५ ।।

अनंतरावजींच्या द्वितीय पत्नी । नाव त्यांचे लक्ष्मीबाई ।
श्री ब्रह्मचैतन्यमहाराजे कृपा सावली । त्यांचे वरी धरलीसे ।।४६।।

उभयता अनेकदा गोंदवल्यासी । जाती महाराजांचे दर्शनासी ।
महाराज मुक्कामास त्यांसी । ठेवून घेती बरेच दिवस ।।४७।।

आठ पंधरा दिवस रहावे । आता महाराज येतो म्हणावे ।
परि महाराजांनी ठेवून घ्यावे । आणखी काही दिवस ।।४८।।





ऐसे बरेच दिवस झाल्यावर । उभयता नमस्कारिती संतवर ।
महाराज नाईलाजे देती रुकार । पुन्हा या म्हणोनी ।।४९।।

ऐसे महाराजांचे प्रेम । निर्व्याज निर्लोभ निःसीम ।
संतभेटीतला संतोष परम । असे अवर्णनीय ।।५०।।

एकदा ब्रह्मचैतन्य महाराज । आले सांगलीसी सहज ।
जाता स्टेशनवरी इंजिनास । वेढा पडला भक्तांचा ।।५१।।

अनंतरावजीही गेले दर्शनाला । महाराजांच्या भेटीला ।
महाराजांसी विचारती त्या समयाला । बापू* आला कां म्हणोनी ।।५२।।

महाराज म्हणती दुःख नको मानसी । आम्ही जाणार बुधगावासी ।
स्टेशनवरी पाठवा दर्शनासी । बापूला तुमच्या ।।५३।।

शाबुदाण्याचा चिवडा घेवोनी । बापू गेला लगबगीनी ।
दर्शन महाराजांचे घेवोनी । साधली कृतार्थता ।।५४।।

महाराजांसी पाहताक्षणी । बापूस आठवली आपली जननी ।
मिठी मारिली कडकडूनी । नयनी प्रेमाश्रूंचा पूर ।।५५।।

महाराज म्हणाले हा । पुढे महासाधू होणार भला ।
आशिर्वाद लाखमोली हा । मिळाला बापूला ।।५६।।

पाठक मास्तर शिष्यवर । महाराजांचे अधिकारी साचार ।
सांगती प्रसंग मनोहर । आपल्या श्रीदादांसी ।।५७।।



* प.पू. गोविंद अनंत ऊर्फ मामामहाराज केळकर

पुर्व सकृत शुध्द ज्यांचे । पुर्व पुण्य शुद्ध ज्यांचे ।
अखिल कुलचि अनंतरावजींचे । गेले उद्धरूनी ।।५८।।

बारा हजार जप शंकराचा । मनोमन करिती नित्याचा ।
उपवासही सोमवारचा । साधला आमरणान्त ।।५९।।

सद्‌गुरुंसी वाटावा अभिमान । ऐसेच असावे वर्तन ।
दिसे पदोपदी प्रसंगातून । पाहू आता ।।६०।।

सद्‌गुरु तोची देव । ऐसा सदाचा त्यांचा भाव ।
अर्पिती आपला जीव । सर्वार्थाने गुरुपदी ।।६१।।

लक्ष्मण दीक्षितजींचे वय झाले । शरीर आवघे थकले ।
नित्यक्रम पूर्ण करण्यास झाले । अत्यवस्थ आता शरीर ।।६२।।

त्रिकाळ स्नानसंध्येचा । नेम होता लक्ष्मण दीक्षितजींचा ।
अनंतरावजीं म्हणती तुमच्या । मदतीला असे हा सेवक ।।६३।।

सद्‌गुरुंकडे जावे । त्यांना पाठीवरी घ्यावे ।
स्नानास नित्य आणावे । कृष्णानदीतीरासी ।।६४।।

स्नान संध्या झाल्यावर । घ्यावे पुन्हा पाठीवर ।
आणून सोडावे सत्वर । घरी त्यांना ।।६५।।

ऐशी श्रेष्ठ गुरुभक्ती । अनंतरावजींची निष्ठा किती ।
धन्यता मिळे निश्चिती । सत्शिष्यासी ।।६६।।





पुढे लक्ष्मण दीक्षितजींचे । देहावसान झाले साचे ।
अंतःकरण या सत्शिष्याचे । हेलावले एकसवे ।।६७।।

रम्य कृष्णानदीतीरी । समाधी बांधली विष्णुघाटावरी ।
निष्ठा अपार गुरुचरणांवरी । मोहक पादुका स्थापिल्या ।।६८।।

प्रत्येक पुण्यतिथीसी । जाती दीक्षितजींचे घरासी ।
चरित्र गावून चरणांसी । अर्पिती सुमनांजली ।।६९।।

सद्‌गुरुंचे यथार्थ वर्णन । करील असे काव्य महान ।
केले उत्कट भावपूर्ण । चाळीस कडव्यांचे ।।७०।।

बह्मचैतन्य महाराजांनी । दिले प्रेम मनापासूनी ।
चित्त जाई भरूनी । निर्व्याज प्रेमाने ।।७१।।

संतमहंतांचे आशिर्वाद प्रेम । हेची आपुले भाग्य परम ।
साधन संपत्ती हीच अनुपम । निष्ठावंत साधकासी ।।७२।।

ब्रह्मचैतन्य माऊली । अखिल जगाची साऊली ।
अनेक भक्तांची मांदियाळी । जमे गोंदवल्याला ।।७३।।

अशा पुण्यपुरुषा करण्या नमन । सुंदर पद्यावलीचे केले गुंफन ।
अनंतरावजींचे अंतःकरण । विरघळून जाई ।।७४।।

एकवीस कडव्यांचे काव्य सुंदर । पाहता डोलते अंतर ।
देहभानाचा पडे विसर । क्षण न लागता ।।७५।।

श्री शंकरांचेही गुणगान । केले तीन पदातून ।
स्वतःस कमीपणा घेवून । शरणागती घेतलीसे ।।७६।।

जो स्वतः लीन झाला । त्याचा कार्यभाग साधला ।
सद्गुरुकृपे सार्थक झाला । जन्म त्याचा ।।७७।।

शूर ओळखावा रणी । साधु ओळखावा मरणी ।
अशीच आहे संतवाणी । प्रत्यय पुढे येईल ।।७८।।

आयुष्याचा शेवट आला । अनंतरावजींचा अधिकार भला ।
नेत्र लागले पैलतीराला । एक वर्ष आधी ।।७९।।

नारायणराव पटवर्धनांना । म्हणाले आता तुम्हीच व्यवहार पहाना ।
मला माझा नेम वाटेना । म्हणोन सांगतसे ।।८०।।

घशाचा कॅन्सर झाला । रोगाने विकल केले देहाला ।
आता एकच ध्यास लागला । सद्गुरुचरणांचा ।।८१।।

शंकरभटजी दीक्षित । गुरुघराण्यातील श्रेष्ठ महंत ।
त्यांसी दूध प्यावया देत । अतीव निष्ठेने ।।८२।।

थोडे दूध वगळण्यासी । सांगितले शंकरभटजींसी ।
मागून शेष प्रसादासी । केले सेवन स्वानंदे ।।८३।।

ऐसी श्रेष्ठ गुरुभक्ती । ऐशी श्रेष्ठ अनन्यभक्ती ।
प्रमाण एक सद्गुरुमूर्ती । धन्य धन्य अनंतरावजींची ।।८४।।





शके अठराशे छप्पन्नासी । पहिली एकादशी आषाढमासी ।
जास्त झाले अनंतरावजींसी । डॉक्टर जोशी आले ।।८५।।

अनंतरावजी म्हणती त्यांसी । ऐकावे बापूचे कीर्तनासी ।
हीच एक इच्छा मानसी । परी येतो आता ।।८६।।

श्रीमामांचे नित्यकीर्तनी । हाती झांज धरोनी ।
साथ केली अनंतरावजींनी । सुमारे बारा वर्षे ।।८७।।

पहिल्या एकादशीसी रविवार । अनंतरावजी म्हणती मामांसी सत्वर ।
कीर्तनात पद म्हणणार । इच्छा माझी अपार असे ।।८८।।

कोणते पद, मामा म्हणाले । अनंतरावजीं तेव्हा बोलले ।
'शंकरा अंत करावा बरवा' ठरविले । मी निश्चय करूनी ।।८९।।

मामा देती पुन्हा पुन्हा नकार । अनंतरावजी धरिती आग्रह फार ।
खुरडत खुरडत खोलीबाहेर । येवून पद म्हणती ।।९०।।

अंतःकरण एकवटून । हृदय गेले हेलावून ।
अश्रूंचे अभिषेक सिंचन । क्षणक्षणा होतसे ।।९१।।

अधिकार ठेविला झाकून । श्री शंकरासी झाले अनन्य ।
सर्वांगाने घेतले न्यूनपण । ऐसे पद ।।९२।।

काय होणार स्पष्ट झाले । अनंतरावजी स्वस्थ राहिले ।
माळ धरूनी जपत राहिले । 'ॐ नमःशिवाय' ।।९३।।

अंतोबा म्हसकर विचारिती त्यांसी । स्मरण आहे नां तुम्हांसी ।
अनंतरावजी देती प्रत्युत्तरासी ।'ॐ नमःशिवाय'खड्या स्वरे ।।९४।।
प्रगट घोष 'ॐ नमःशिवाय' चा । पहाटे तीन पर्यंत करी वाचा ।
घोर लागला बंद झाली वाचा । परी निमग्न अंतरी ।।९५।।
वाचा थांबली परी जप चालला । हातात फिरे जपमाला ।
श्री शंकरांचा सोमवार उजाडला । सकाळचे सहा वाजले ।।९६।।
माळा गळून पडली । काया वाचा मौनात आली ।
दृष्टी मात्र अंतरी खिळली । भ्रूमध्याकडे ।।९७।।
दुसरी आषाढी एकादशी । एक दशा प्राप्त अनंतरावजींसी ।
समरस झाले गुरुतत्त्वासी । आत्मज्योत होई मंद मंद ।।९८।।
आली विश्रांतीची वेळ । ओसरले नीर प्रेमळ ।
नयनी देखिले सद्गुरुमुखकमल । धाले मन आनंदाने ।।९९।।
सद्गुरु आले न्यावयासी । आपुल्या या सत्शिष्यासी ।
अनुभवती मरण सोहळ्यासी । अनंतरावजी ।।१००।।
संत आले जेथून । जाती तेथेच परतून ।
आपणासमोर आदर्श ठेवून । परमार्थ आचरण्याचा ।।१०१।।
सकाळी आठ वाजता जाण । भ्रूमध्यावरी दृष्टी ठेवून ।
ज्योत ज्योतीस जाय मिळून । क्षण न लागता ।।१०२।।





आत्म-ज्योत जीवनज्योत । दोन परी एक होत ।
मामांचे वचनाची येत । प्रचीती या समयी ।।१०३।।
ऐसा अंतःकाळ साधला । निर्याणप्रसंगी अधिकार सिद्ध झाला ।
साधु गेले वैकुंठाला । राहिला देह भूवरी ।।१०४।।
श्रीनाना श्रीमामा श्रीदादा त्रिवेणी । रहावी नित्य स्मरणी ।
हीच असे अमृतखाणी । भवसागर तरण्या ।।१०५।।
सर्व तीर्थे लागती चरणासी । ऐशी महती या संतांसी ।
पार नसे भाग्यासी । दर्शन घेता ।।१०६।।
ज्यास पाहिजे परमार्थ । ज्यास पाहिजे सुख शाश्वत ।
ज्यास साधणे निजस्वार्थ । त्याने यावे या मंदिरी ।।१०७।।
साधन पूजन कीर्तन । नाही लौकिकाचे प्रयोजन ।
निजध्यास लागता समाधान । मिळे आपणासी ।।१०८।।
पिढ्यान्पिढ्याची उपासना । अखंड चालो या श्रीरामनिकेतना ।
हीच एक प्रार्थना । ईश्वरचरणी करीतसे ।।१०९।।
श्रीदासराममहाराजांनी स्फुरविले । तैसेचि सर्व असे लिहिले ।
जे काही न्यून असेल राहिले । त्याची क्षमा मागतो ।।११०।।
भगवान श्री निंबरगीकरमहाराज । श्री ज्ञानेश्वरमहाराज ।
श्री तात्यासाहेब कोटणीसमहाराज । यांची ही कृपा असे ।।१११।।

चिमड संप्रदाय सिद्ध परंपरेसी । शतशः प्रार्थना चरणांसी ।
उद्धराया आपुल्या पामरासी । प्रेमाशिर्वाद द्यावा ।।११२।।
शके एकोणीसशे एकतीस । जेष्ठ महिना संकष्टीस ।
श्री अनंत अमृत स्मरणास । सद्गुरुचरणी अर्पितसे ।।११३।।

।। राजाधिराज सद्गुरुनाथ महाराज की जय ।।

लेखक – **श्री प्रसन्न पांडुरंग गोखले**





## श्री तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचेवरील

## * पद *

पेठ वसविली सांगली ग्रामी हरिगुण नामाची ।
काय मौज त्या पेठेमाजी गर्दी उतारूंची ।।ध्रु।।
एक लक्षका रुपया देता देती हिरे तेरा ।
तेरामाजी साठविला तो परमेश्वर सारा ।।१।।
माल लागला बंदराला अमोलिक पाही ।
जो तो येतो घेऊनी जातो लक्ष देवुनी पाही ।।२।।
ययाकारणे सवंग जाहला खरा माल पाही ।
लूटची करिती घ्या घ्या म्हणती जेवी तृप्ती होई ।।३।।
कितीही लुटला तरी न संपे माल हा तो बरा ।
जो तो येतो घेऊनी जातो आनंदुनी घरा ।।४।।
पेठ वसविली सांगली ग्रामी हनुमंतरायांनी ।
छत्तीस वर्षे लुटुनी लुटले घ्या म्हणती कोणी ।।५।।
राम बाळ हा आनंदुनी नाचत हो गेला ।
मौक्तिकांचा चुरा पाहुनी अंतरी घेऊनी आला ।।६।।

**- श्रीदासराममहाराज केळकर**

## प.पू. श्री अनंत गंगाधर केळकर यांची

# * आरती *

आरती अनंतराया । तुम्ही करावी माया ।
आपुलीया मातेसाठी । अती झिजविली काया ।। धृ ।।

यती दीक्षितांच्या करवी । पार्थिव पूजा घेतली ।
पंचप्राण समर्पोनी । अती निष्ठे चालविली ।।१ ।।

लक्ष्मीबाईंसह तुम्ही । गोंदवलेक्षेत्री गेला ।
गोंदवलेकरमहाराजांचा । प्रेमाशिर्वाद मिळाला ।।२ ।।

तात्यासाहेबमहाराजांनी । तुम्हावरी प्रेम केले ।
मौजेचे पद म्हणता । मंदिर मौजेने डोले ।।३ ।।

सोमवार मनी योजिला । देह सार्थक केला ।
शिवरूप तुम्ही झाला । दास पायी विनटला ।।४ ।।

– श्री प्रसन्न पांडुरंग गोखले



।। श्री रामेश्वर प्रसन्न ।।
।। श्री सोमेश्वर प्रसन्न ।।

## ती.प.पू.कै. अनंत गंगाधर केळकर कृत

# प द्या व ली

ॐ

– प्रकाशन –
आषाढ शुद्ध १२ शके १८९५, सांगली. (१९७३)

– प्रकाशक –
राम गोविंद केळकर

# श्रीगुरुलिंग गीतेतील पहिले पद

नमो नमो गुरुलिंगजंगमेशा ।।ध्रु।।

नाम रहितने । नारायण महात्मने ।
भवकडिसो बेगने । निजधामने ।।१।।

करवीरवाशा । श्रीगुरुकाडसिद्धेशा ।
भक्तरभाव दोळवाशा । सर्वेशा ।।२।।

प्रियरघुवीर दाता । बेडीद वरव कोडुवाता ।
चिमडमठ दोळिरुवाता । गुरुनाथा ।।३।।

साधुपुरुषने । श्रीगुरु रामचंद्रने ।
साधुराज शिष्यने । चिमड वासने ।।४।।

हिंचगेरीशा । भाऊराव गुर्वेशा ।
श्रीगुरुनामनिवाशा । साधकेशा ।।५।।

श्रीनागाप्पाण्णा । गुरुसाधनराणा ।
चरणी **गुरुसिद्दण्णा** । निरंजना ।।६।।



।। श्री गणेशायनमः ।।

## प्रकाशकाचे दोन शब्द

माझे ती.प.पू.कै. आजोबा अनंत गंगाधर ऊर्फ अंताजीपंत केळकर कृत पद्यावली प्रकाशीत करणेचा सुयोग परमप्रिय श्री. किसनराव भिडे यांचेमुळेच आला. या पद्यावलीचे प्रकाशनास त्यांचे बहुमोल सहाय्य झाले आहे, हे सांगणेत मला आनंद वाटतो. हा आनंद व्यक्त करणेस मजजवळ पुरेसे शब्द नाहीत. श्री. भिडे यांची ती.प.पू. कै. श्रीमामांचेवर अनन्य निष्ठा असलेने त्या निष्ठेस अनुसरून त्यांनी ही पदावली साकार केली आहे.

आमचे आजोबाना आम्ही 'नाना' म्हणतो. आमचे ती. नानांचे वडील ती.कै. गंगाधरपंत व मातोश्री ती.सौ.कै. पार्वतीबाई होत. नानांचे शिक्षण फायनल अखेर झाले असून ते सांगलीस एज्युकेशन इन्स्पेक्टर ऑफिसमध्ये हेडक्लार्कचे काम करीत होते. ३० वर्षे सर्व्हीस झालेनंतर त्यांनी पेन्शन घेतली. ते मोठे मातृभक्त होते. आपल्या आईला भात आवडतो म्हणून त्यांनी बेळगावजवळ कलखांब येथे भाताची जमीनच खरेदी केली. सांगलीस घर बांधले आणि आपले मातोश्रीचे स्मृती प्रीत्यर्थ घरी असलेल्या विहीरीचा जीर्णोद्धार केला. **ह्यांचा हिशोबात हातखंडा होता. दानधर्म वाटेल तेवढा करतील पण हिशेबात**

**एक पै ही सुटणार नाही. अशी बाणेदार वृत्ती होती. नानांच्या पहिल्या पत्नी ती.सौ.कै. राधाबाई या श्री. मामांचे बालपणीच कैलासवासी झाल्या. यामुळे त्यांची चांदीची वाटी मामानी जीवापाड जतन केली.** आमचे नानाना सांगलीचे श्री. लक्ष्मण दीक्षित या सत्पुरुषांचा अनुग्रह असून त्यांचेकडून नानानी पार्थीव पूजा घेतली होती. संध्या, पार्थिव पूजा, रोज बारा हजार शंकराचा जप व सोमवारचा उपवास त्यांनी आमरण केला. पूर्वी ते वैश्वदेवही रोज करीत. गुरू घराण्याकरिता त्यांनी तन, मन, धन वेचले यात प्रश्नच नाही. आपल्या गुरूंची विष्णूघाटावर समाधी बांधली. त्याची पूजा ते नित्य नेमाने करीत. व सद्गुरूंची पुण्यतिथी दीक्षितांचे घरी साजरी करून पद्यांत गुंफलेले श्री. लक्ष्मण दीक्षितांचे चरित्र ब्राह्मण भोजनास बसले म्हणजे उत्कट भावपूर्ण असे उभे राहून म्हणत व नंतर आपण प्रसाद घेत. नानांचे नंतर बरीच वर्षे आमचे वडील ती.प.पू.कै. श्रीमामा हे पद्य दीक्षित यांचे घरी याच श्रद्धेने म्हणत असत. **आमचे श्रीमामा हे अत्यवस्थ आजारी असताना माईनी आपले आयुष्य तू बापूला दे अशी ईश्वराची प्रार्थना केली व तसेच ते घडले !** अनेक संतांचे दर्शनाचे भाग्य आमचे नानाना लाभले होते. श्री. ब्रम्हचैतन्य गोंदावलेकरमहाराज यांचा अनुग्रह आमचे नानांच्या द्वितीय पत्नी ती.सौ.कै. लक्ष्मीबाई (माझी आजी) यांना असून त्यांच्यामुळे





नाना गोंदावल्यास महाराजांच्याकडे जात आणि महाराज त्यांना ठेवून घेत, सोडत नसत. कितीहि राहिले तरी एवढी काय गडबड आहे रहा असेच म्हणत. मग अगदी केव्हातरी नानानी आता गेलेच पाहिजे असे म्हटले म्हणजे मग या तर असे म्हणत. माझ्या तीर्थरूपांच्या जनक मातोश्री ती.सौ.कै. राधाबाई (माझी आजी) या तीर्थरूपांचे लहानपणीच कैलासवासी झाल्याने बुधगांव स्टेशनवर महाराजाना पहाताच आपली आईच भेटली असे वाटून त्यांनी महाराजांचे कमरेला मिठी दिली आणि प्रणिपात केला. महाराजानी माझ्या तीर्थरूपांचे पाठीवर हात फिरवला व हा पुढे महासाधू होईल असे उद्गार काढले. असे महाराजांचे परमशिष्य श्री. पाठक मास्तर मला आमचे घरी आले की सांगत असत.

श्री. टेंबे स्वामी व त्यांचे अधिकारी शिष्य श्री दीक्षित स्वामी यांचेही आमचे नानांचेवर फार प्रेम होते. त्यांनी आमचे नानाना प्रसाद म्हणून एकेक रुपया दिला होता. तो प्रसाद आमचे घरी तेव्हांपासून जीवापाड जपला असून त्याची वार्षिक पूजा आमचे येथे होत असते. श्री टेंबे स्वामींचे परमशिष्य श्री वामनरावजी गुळवणीमहाराज आमचे घरी माझे तीर्थरूपांनी देह ठेवल्यावर आले. त्यावेळी हे रुपये पाहताच आपले मस्तकी धारण केले व त्यांचे डोळ्यातून प्रेमाश्रु सुरू झाले. आमचे

श्रीमामांचे (तीर्थरुपांचे) दर्शनास महाराज आले याचा धागा दोरा येथे आहे. हा योग श्री तात्या कुलकर्णी यांनी घडवून आणला.

भगवान श्रीसद्‌गुरु तात्यासाहेब कोटणीस यांचे नित्याचे कीर्तनास माझ्या आजी ती.सौ.कै. माई (लक्ष्मीबाई) या रोज जात असत. त्यांचा व श्री. तात्यासाहेबमहाराज यांच्या पत्नी ती.प.पू. श्रीसद्‌गुरु सौ. मातोश्री लक्ष्मीबाई ऊर्फ आईसाहेब यांचा फार घरोबा होता. आमचे घरी एखादा पदार्थ केला तर तो कोटणीसांचेकडे जावयाचा व तेथे काही पदार्थ केला तर तो आमचेकडे यावयाचा. आमचे नानाही वरचेवर श्री तात्यासाहेबांचे कीर्तनास जात व ते याना 'मौज दिसती रे' हे पद्य म्हणावयास सांगत आणि हे पद नानांनी म्हटले की, खरीच मौज होई. म्हणून ते पद्य या खाली उधृत करतो.

**मौज दिसती रे । आजी मोठी मौज दिसती रे ।।ध्रु.।।**
**ध्वनीमध्ये मन रंगुनि गेले । भृभंगावरी लक्ष लागले ।**
**नढळे पाती नीर चालिले । लाटचि येती रे ।।१।।**
**अरूणोदयसम सुरंग सगळे । विजा चमकती बहु कल्लोळे ।**
**येके येके जळी उठती विशाळे । भासति नासति रे ।।२।।**
**पाहता पाहता न दिसे काही । दिसते परि ते फिर फिर पाही ।**
**मागे पुढे दाटले घनदायी । सहजचि ज्योती रे ।।३।।**





**नरहरीनाथे हस्तकी धरिले । जन्म मरण हे सहज विसरले ।**
**महपती नयनी स्वरूप भरले । स्वयंज्योती रे ।।४।।**

श्रीतात्यासाहेबानी देह ठेवल्यावर आमचे ती.प.पू.कै. वडील श्रीमामा याना नित्य कीर्तन करणेची आज्ञा प्रत्यक्ष प्रगट होवून दिली व त्याप्रमाणे श्रीमामानी हे नित्य कीर्तन आपले देहावसानापर्यंत केले. या कीर्तनात नाना झांज घेऊन साथ करीत व 'आमचे नानानी येवढे घर बांधून ठेवले म्हणून मला कीर्तन करणेची सोय झाली. माझ्या आईचा आशिर्वाद व श्रीतात्यासाहेबांची परमकृपा अशी मोठी दुहेरी शक्ति या मागे आहे' असे मामा वारंवार म्हणत असत. नानानी या प्रकारे एक तप श्रीमामांचे कीर्तनास सहाय्य केले . श्रीतात्यासाहेबांचे कीर्तन-श्रवण केल्याने नानांची कीर्तन-भक्तीवर निःसीम भक्ती होती. श्रीतात्यासाहेबांचेकडून नानानी मार्गदर्शनही करून घेतलेले होते. यामुळे त्यांनी आपला अंतकाळ उत्तमच साधला. आमचे नाना श्रीतात्यासाहेबांचेबद्दल म्हणतात,

**अज्ञजना ताराया संता येणे असे हरी वदले ।**
**सद्य स्थितीहि पहाता सांप्रत तैसे महंत मज गमले ।।१।।**
**गुरु अंजनीच दृष्टी स्थिर करताना घडे हा अवतार ।**
**हनुमंत नाम साजे जन उद्धरण्या आलेचि साचार ।२।।**
**विद्वत्ता बहु असुनी वर्तन साधे कितीतरी वानू ।**

**भूत दया अती तरती ज्ञानी शोभती जसा नभी भानू ।।३ ।।**
**गुरु सेवा रूपाने हीना दीना प्रमोद हा करिती ।**
**छत्तिस वर्षे ऐसे कीर्तन चाले गुरुकृपेवरती ।।४ ।।**
**शक अठराशे सत्तिशी विभूती मासीच कृष्ण षष्ठीसी ।**
**सोमवार शुभ पाहुनि गुरुनाथे घातलेचि पाठीशी ।।५।।**
**हीन दीन मी असतां गुरुराये मज कृपेचि करि धरिले ।**
**भवव्याधी ही निरसुनि अनंताला अनंतची केले ।।६ ।।**

नानांना आपला अंतकाल समजलेला होता. एक वर्ष त्यांनी घरातील संपूर्ण लक्ष काढले होते. आमचे मामेबंधू ती.रा. नारायणराव पटवर्धन यांना त्यांनी तुझा तू आता व्यवहार पहा असे सांगितले. आमच्या ती. आत्याबाई बोलली, नाना असे का म्हणता ? नाना म्हणाले, माझा आता नेम नाही. पुढे त्याना घशाचा कॅन्सर झाला होता. औषधपाणी व सेवा सुश्रुषा माझे ती. श्रीमामा यानी व ती.सौ. मातोश्रीनी फार उत्तमप्रकारे केली असे नानानीच उद्गार काढले. श्री. बाबूरावजी करमरकर यांचेवर नानांचा फार लोभ होता. त्यांना 'बापूकडे लक्ष ठेवा' असे नानानी सांगितले व लिमये मामीना ताईंकडे लक्ष देण्याबद्दल सांगितले. ब्राह्मणांना हजार पाचशे रुपये तरी दानधर्म केला. गु. शंकरभटजी दीक्षित हे गुरु घराण्यातले. ते आले असता





त्यांना दूध प्यावयास दिले व त्यातील थोडे वगळणेस सांगून तो शेष प्रसाद आपण घेतला. धन्य त्या गुरुभक्तीची. सहस्त्रबुद्धे स्वामींना आता येतो म्हणून नमस्कार केला. हे स्वामी श्रीमामांचे नित्याचे कीर्तनास नेमाने येत असत. पहिली आषाढी एकादशी. कीर्तनात **'शंकरा अंत करावा बरवा'** हे पद नानानी म्हटले. व रात्री जे निजले तेथून एकदम त्यांचे जास्तच वेगळे दिसू लागले. डॉ. जोशी आले होते त्याना नाना म्हणाले, 'मला फक्त बापूचे कीर्तन ऐकावे एवढीच इच्छा होती पण येतो आता' असे म्हणून डॉक्टरांना नमस्कार केला. श्री. अंतोबा म्हसकर यांनी विचारले, नाना स्मरण आहे ना ? तेव्हां नानानी ताडकन 'ॐ नमः शिवाय' ही अक्षरे उच्चारली. आश्चर्य ! रात्री तीन वाजेपर्यंत हा घोष चालू होता. पुढे त्यांना घोर लागला. तोंड बंद झाले पण हातातील माळ चालू होती. सकाळी ६ वाजता हातातील माळ गळून पडली. दुसरी आषाढी एकादशी वार सोमवार. सकाळी ८ वाजता भ्रुमध्यावर दृष्टी स्थीर करुन नानानी शिवस्मरणात आपला देह ठेविला. असे आमचे आजोबा होते. त्यांचे आठवणीने अजुनही अंतःकरण हेलावून जाते. त्यांना माझे अनेक प्रणिपात. अशा आमच्या नानानी केलेली पद्यावली ही काय मोलाची आहे हे जाणतेच ठरवतील. अशी ही पद्यावली नानांचे

पुण्यतिथीस त्यांचे सद्‌गुरु श्रीलक्ष्मण दीक्षित यांचे चरणी समर्पण करीत आहे.

## — आभार —

या पुस्तकासंबंधी जे जे कांही केले गेले ते सर्व परमप्रिय किसनराव यानीच केले आहे. येथे माझे फक्त दोन शब्द आहेत पण तेही श्रीतात्यासाहेब महाराज यांचे प्रेरणेने. यामुळे कोणी कोणाचे आभार मानावे हा प्रश्नच आहे. तथापि चि. पांडुरंग सीताराम गोखले यांनी याची प्रुफे तपासली व श्री. वासुदेवराव करमरकर यांनी प्रेस कॉपी करून पुस्तक त्वरीत व सुबक छापून श्री. भिडे यांचे धन्यवाद घेतले हे नमूद करणे अगत्याचे आहे.

**- राम गोविंद केळकर**





# * पद १ ले *

## श्री. लक्ष्मण दीक्षित यांचेवरून केलेले पद

धन्य धन्य श्रीगुरुराज हे शंकर अवतार ।
सत्य सत्य हे वदतो त्यांचा दास मी किंकर ।।ध्रु.।।

लक्ष्मण दीक्षित नाम जयाना पूर्वाश्रमी साजे ।
लक्ष आणि मन शिवपदी ठेऊनी तद्रुप जाहले जे ।।१।।

कृष्ण वेणीचे स्नान करोनी हरिहर पूजीती ।
प्रदोष काळी नित्य नेमे शिव दर्शन घेती ।।२।।

वेदाध्यायन साग्र करोनी अग्नी सेवा करीती ।
यज्ञेश्वर या नामघोषे कोरान्ना घेती ।।३।।

नित्य अतीथी पंक्तिस घेऊनी भोजन ते करिती ।
सर्वाभूती शिव हा जाणुनी सकला तुष्टविती ।।४।।

नरहरी आणि सदाशिवाची उपासना ज्याशी ।
अखंड स्मरणे गौरीशंकर भेटी देती त्यासी ।।५।।

मंत्र पठणी तशीच श्रवणी असे बहु प्रीती ।
जयंतीचे दिवशी सर्वहि वेद घोष होती ।।६।।

शिवमंदिरी प्रदोषकाळी दीप लावविती ।
तं निमित्ते ब्राह्मणासी भूमि गृह देती ।।७।।

चार तपाहुनी अधिक अशी ही उपासना करिती ।
पादचारी काशीस जाऊनी विश्वनाथ पाहती ।।८।।

मार्गक्रमिता लिंग पूजना एकटेचि राहती ।
परी जन सारे पुढे जाऊनी आडमार्गा जाती ।।९।।

अशा समयी विश्वनाथ हे अश्वारुढ होती ।
यासी पुसोनी मार्ग दाऊनी गुप्तचि ते होती ।।१०।।

काशीवासी कोरान्नावर न होय उदरपूर्ती ।
विश्वेशाने मनी जाणुनी अन्नपूर्णा देती ।।११।।

सांगलीग्रामाहूनी सदाशिव हुंडी धाडी त्यासी ।
ऐशी लीला पाहुनी प्रेमे सद्गदीत होती ।।१२।।

भागीरथीची कावड घेऊनी रामेश्वरी जाती ।
गंगा घालुनी सेतू आणूनि काशीत टाकीती ।।१३।।

सीतज्वराने तनु पीडुनी बहुशुष्क जाहली ।
सदाशिवाना प्रार्थुनीया ती पाळी चुकवीली ।।१४।।

महादान न मिळता एक ब्राह्मण बहु कष्टी ।
आपण घेऊनी त्यासी देऊनी केले बहु तुष्टी ।।१५।।





रघुनाथ या नामे द्विजसुत अध्ययना होते ।
वेदसहीत शिव दिक्षा देऊनी धन्य केले त्या ते ।।१६।।

पूत्रा सम हे प्रेम त्यावरी रघु ऐसे म्हणती ।
अखंड गुरूची सेवा करुनी कृतार्थ ते होती ।।१७।।

लक्ष्मीबाई या नामे स्त्रीने पुत्रा प्रार्थियले ।
प्रसाद देता सरनोबत कुळी पुत्ररत्न जाहले ।।१८।।

भक्तिबलाने ऐशा लीला बहुता दाखविती ।
जप यज्ञाने भोळा शंकर आला ज्या हाती ।।१९।।

शिव षडक्षरी तारक जो तो मंत्र असे ज्याचा ।
बारा सहस्त्र नित्य करूनी ही सदा वदे वाचा ।।२०।।

सदाशिवाचे अभेद भजनी अखंड गुरु रमती ।
भवसिंधुतुनी पार तराया हाची मार्ग वदती ।।२१।

गृहीणी पुत्र आणि स्नुषा ही परलोका गेले ।
तीतीक्षाही पूर्ण जयांना स्थैर्य नाही ढळले ।।२२।।

पौत्र वासुदेव तशीच सत्पत्नी ती उमा ।
अल्पवयी असुनी ही सेवा केली सप्रेमा ।।२३।।

मला वाटते उमा नव्हे ही सती या गृही आली ।
वृद्धपणी श्रीगुरुचे सेवे ईशे पाठवली ।।२४।।

तस्कर येऊनी गृह फोडुनिया अलंकार नेती ।
शांती पुष्टी पूर्ण जयाना शिव इच्छा म्हणती ।।२५।।
राजस्त्रियेने ऐकुनी वार्ता दिधले धन त्यासी ।
ब्राह्मण भोजनी खर्चुनी तुष्ट केले शंकराशी ।।२६।।
अल्पतुष्टी आणि नच संग्रह ही अशी असे वृत्ती ।
सर्व ईषणा शुष्क जाहल्या पांथिकवत चित्ती ।।२७।।
समाधान आणि शांतीचीहि स्वयंभूच मूर्ती ।
प्रणवाच्या ध्यासे ज्यांना नसे देह स्फूर्ती ।।२८।।
जागृतिमध्ये सदाशिवाचा ध्यास जया राहे ।
स्वप्नी हे ती स्थिती मानूनी वृत्ती रूपा पाहे ।।२९।।
सुषुप्तीत जीव होतसे शिवपदी लीन ।
अशाक्रमे हा सदा घडतसे शिवयोग जाण ।।३०।।
या परी तीनहि आश्रम सेऊनी चतुर्थ तो घेती ।
विरजा दीक्षे प्रणव लक्षुनी परमहंस होती ।।३१।।
तीन दिवस हा आश्रम सेऊनी ब्रह्मीभूत झाले ।
जीव शिवपद हे मावळोनी असी पदे उरले ।।३२।।
तपोबलाने शरीरकांती सुवर्ण सम जाहली ।
देह ठेविता सुहास्यमूर्ती सतेजची दिसली ।।३३।।





काषायांबर दंड कमंडलू व्याघ्रासनी बसली ।
कृपाकटाक्षे पाहे ऐशी गुरुमूर्ती दिसली ।।३४।।
शके १८२८ कार्तिक सप्तमीसी ।
शुक्लपक्षी देहत्रय त्यजुनी जाहले अविनाशी ।।३५।।
हीन दीन या दास अनंता अपुला म्हणवीला ।
कृपाकर हा मस्तकी ठेऊनी शिवमुद्रित केला ।।३६।।
गुरुमायेने स्फूर्ती घेऊनि जे हे वदविले ।
सुमनरूपी ते प्रेमतंतुने चित्ती गुंफीयले ।।३७।।
गोविंदाचे*प्राण रक्षणा धाऊनिया श्रमली ।
शिवनंदीही स्तवन मालिका प्रेमे अर्पियली ।।३८।।
दासाच्या या वंशवृक्षा गुरुनी पाळावे । गुरुनी वाढवावे ।
शिवपदी त्यांची निष्ठा राही अशा वरा द्यावे ।।३९।।
तन-मन-धन हे ठेऊनी गुरुपदी कुर्वंडिली काया ।
अंतकाळी प्रगटुनी स्वामी **दासा** ताराया ।।४०।।
धन्य धन्य...............



*ती.प.पू.कै.श्रीबापूरावजी केळकर, सांगली

# * पद २ रे *

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदावलेकर सद्गुरूंचेवरून केलेले पद

गोंदावलीची माझी आई कोठे मी पाहू ।
तद्विरहे जीव व्याकुळ होतो कैसा मी राहू ? ।।ध्रृ.।।

काय प्रेम हे गुरुमायेचे न बोलवे वाचा ।
अनन्य होता प्रेमपान्हा नावरेचि तीचा ।।१।।

किती मधूर ते बोल गोमटे तृप्ती न कधी होई ।
सदा मिळावे ऐसी इच्छा श्रोत्रद्वयि राही ।।२।।

निरहंकृतीचे सदा बोलणे सहजची उपदेश ।
शुद्ध भाविका ह्रदयी बाणुनी फिरती संदेश ।।३।।

अति कनवाळू गुरुमायहि जननीहुनी गाढी ।
नामामृत ते प्राशन करुनी भवबंदा तोडी ।।४।।

अमितपुत्र आणि तशा कन्यका प्रसवे ही माय ।
या सर्वांचे कृपाकटाक्षे रक्षण ते होय ।।५।।

श्रमुनी भागुनी मुलामुलीनी या माहेरा यावे ।
अगत्याने गौरवुनी त्या येऊनीया घ्यावे ।।६।।





नित्यक्रम हा असाचि चाले या मायेघरचा ।
अगत्य गौरव वाढत जाई अनुभव सर्वांचा ।।७।।

आपुल्या पंक्तित घेऊनि त्यांचा पुरवावा हेत ।
काय सोहळा त्या प्रेमाचा देहभावरहित ।।८।।

सांप्रदाइकाहुनी इतरावरी प्रेम खूण राही ।
लहानथोर हा भेद न तेथे सर्वा समता ही ।।९।।

किती काल हा जाता लव क्षण इतुकाची वाटे ।
माय निरुपणी प्रेमानंद सबाह्य तो दाटे ।।१०।।

अशा आनंदामधे बहुदिन येऊनिया घ्यावे ।
मागुती जाण्या आज्ञा मागता कौतुक करावे ।।११।।

आज उद्या हे बहुदिन चाले काय शुद्ध प्रेमा ।
अनुभवी असती त्यांच्या भाग्या जाहली असे सीमा ।।१२।।

फराळाचे करुनी देऊनि आज्ञा ही द्यावी ।
निघता नमना आल्यावरती वस्ती करवावी ।।१३।।

इच्छित श्रवण पुन्हा करवूनी नामगजर होती ।
माय समागमी रघुपती स्मरणी त्रिविध ताप हरती ।।१४।।

अशा परीने निजबालांचे कौतुक करी माय ।
स्मरण  हे होता कंठ दाटूनी वृत्ती स्तब्ध होय ।।१५।।

अखंड कंठी नाम धरावे श्रीराम जयराम जयजयराम ।
रामस्मरण न सोडा हेचि माय प्रेम ।।१६।।

अशी बोळवण करुनी कष्टे आज्ञा दे माय ।
परी बालांचा विरहा योगे उचले नच पाय ।।१७।।

ऐशा समयी बोध करुनिया विरह नाश करती ।
उतराई हे कैसे व्हावे या मायेवरती ।।१८।।

उतराई हे कधी नच होणे हेचि वसो हृदयी ।
गोंदावलीचे माझे आई हेचि मला देई ।।१९।।

अगाध महिमा काय मी वर्णू प्राकृत अति मूढ ।
स्फूर्ती घेऊनी बोळविले ते माते लागे गोड ।।२०।।

बहिणाक्कानी कृपा करुनिया जोडविली ही माय ।
लक्ष्मीयोगे मज ही लाधली वंदितसे पाय ।।२१।।

गोंदावलीची माझी आई...............





## * पद ३ रे *

शंकरा श्रीगुरुनाथा तारा मज दीनानाथा ।।ध्रु.।।

गुरुजी शिवमंदिरी न्हेले शिवस्वरूपा बोधियले
तसेच नामहि दिधले बीजासह तारक जे ते
तै पासुनि दास तुझा हा बहुपातकी हीन असा हा
करी धरुनी काढावा हा भवसिंधुतुनी या आता ।।१।।

शिवव्यापक नामरूपासि बोधिता जरी मी दमलो
तरी सर्वहि सत्ता प्रभुची शिवस्फुरणे मी ते वदलो
सर्वहि उपाधी टाकी वदवीता असे तो पाहा की
शिव उरला भरूनी नाकी यः परेशमहेश्वर त्राता ।।२।।

पूजनादि जपतप काही नेणे मी मूढ म्हणोनि
सर्वस्वी प्रपंची बुडतो दुःखाचे सौख्य गणोनी
भवतारक या तवनामा सांगडिशी सम गाठोनी
तव नामचि धरले कंठी गुरूवचने ठेऊनी राहटी
तारी तारी आता धूर्जटी मोह पाशातुनी हो ताता ।।३।।

मृगजलवत जग हे पाही शिवस्वरूपी पाहता नाही
अनुभव हा याचि देहि येता हे क्षण क्षण पाही
परी मागुती श्रमतो पडतो या दृश्या सत्यचि
म्हणतो मी माझे असे बडबडतो नाशा या संनिपाता ।।४।।

बहुपातकी जरी मी आहे तरी देवा तुमचा झालो
कोणीहि आपुले नाही अनुभवुनी शरण मी आलो
आता कसाहि असलो देवा तरी नाभी मजतो
ठाव देऊनिया निजसुख ठेवा चरणी या **दास अनंता** ।।५।।

## * पद ४ थे *

मुक्ति मिळेलचि खास तयाला मुक्ति मिळेलचि खास ।।ध्रृ.।।
भवसिंधुतुनी पार तराया नामाची तरणीच ज्याला ।।१।।
गुरुकृपेने वर्म जाणुनी तारे शिव सम नाम याला ।।२।।
अशा साधनी निश्चळ रमता देहभाव हा जाय लयाला ।।३।।
अगाध लीला गुरुरायाची ज्ञानबोध करिताच याला ।।४।।
यमनियमादिक ध्यानधारणा गुरुकृपे फळतीच तयाला ।।५।।
साराचे हे सार जाणुनी जोडील गुरुचरणास तयाला ।।६।।
अन्य साधने बहु कष्टाची सुलभ मिळे हे सुकृत तयाला ।।७।।





शिवनंदी हा **दास अनंत** जडला गुरु चरणास तयाला ।।८।।

## * पद ५ वे *

शंकरा अंत करावा बरवा । निशीदिनी पाही ।
हेची मागणे । पूर्ण कृपेने घडवा ।।ध्रु.।।
सुकृत काही गाठी नसे मम । संसारामधे केले बहुश्रम ।
खंती वाटे या कृत वा वा ।।१।।
साठावरी ही वयसा गेली । अंतकाळीची दृष्टी प्रगटली ।
यास्तव नमितो श्रीमहादेवा ।।२।।
अंतकाळी ज्या कठिण यातना । भीती उपजली बघुनी मन्मना ।
भोळ्या शंकरा करि बा कणवा ।।३।।
अंतकाळ हा पाठी लागला । गडबडले मन धीर सुटला ।
हात देऊनी भवभय हरवा ।।४।।
इंद्रियलोलुप आजवरी जाहलो । स्वहित बुडाले सहजचि फसलो ।
कृतापराध हा क्षमा करावा ।।५।।
जपतपसाधन काहीच नेणे । वयसा गेली काही न होणे ।
म्हणुनी दास्यपथ धरिला बरवा ।।६।।

सर्व इंद्रिया स्वास्थ्य ठेवुनी । कोणावरीही भार न पडुनी ।
नेई दासा तवपदी देवा ।।७।।
सर्व भार हा आपणची घ्यावा । गर्भी रक्षिता तूचि देवा ।
अनन्य दासा पूर्ण विसावा ।।८।।
मागाया हे लाज वाटते । कोणा सांगू हृद्गत मम ते ।
पश्चात्तापलो जिवीच्या जीवा ।।९।।
जागृती येऊनी सोहं भाव । लिंगपूजनासी नामा तव ।
प्राणांतावरी घ्यावी सेवा ।।१०।।
अंतरीचा प्रभू हेतू जाणुनी । ज्ञानदृष्टीने स्वरूप बाणुनी ।
मन मारूनी मज उगमी मिळवा ।।११।।
एकादश पद्यांची ही माला । कंठी राहो गुरूदयाळा ।
**दास अनंत** आपला म्हणवा । अंत करा हा बरवा ।।१२।।
पुत्रपौत्र धन सुख ही दिधले । रक्षुनि त्याते सुख द्या वहिले ।
संकटी स्मरता घ्यावा धावा ।। अंत करावा ।।१३।।

## नमन

रेवणसिद्ध मरुळसिद्ध ।
काडसिद्धप्रभु शिवसदया ।।

गुरुलिंगजंगम अक्का माउली ।
साधुराज रघुनाथप्रिया ।।ध्रु।।

रामचंद्र प्रभु हनुमंत सद्‌गुरु ।
नागाप्पाते नारायणया ।।

रघुनाथ गोविंद गुरुजनाते ।
कीर्तनकाळी मनी नमूया ।।१।।

बालराम हा मागे निरंतर ।
कीर्तनी मती द्या गुण गाया ।।

हीच विनंती संतसज्जना ।
आशिर्वाद द्या दासा या ।।२।।

**- श्रीदासराम**

## पद

चिमड क्षेत्री सद्‌गुरुमाई ।
जगदोद्धारा तिष्ठत राही ।।ध्रु।।

रघुनाथप्रिय गुरुवर त्राता ।
कैवल्याचा पूर्ण प्रदाता ।।१।।

रामचंद्रप्रभु दिनोद्धरता ।
घोर भवाचे शासनकर्ता ।।२।।

मोक्षलक्ष्मी अक्का माऊली ।
जन ताराया उभी राहीली ।।३।।

गुरुलिंगजंगम स्वामी कृपेची ।
छाया सर्वा परोपरीची ।।४।।

संसारी जन फिरता श्रमले ।
भवभय वारुनी मुक्तची केले ।।५।।

हरी नामाची माला दिधली ।
आत्मस्वरुपी वृत्ती वेधली ।।६।।

स्थावर जंगम भरली पाही ।
**दासा** दैवत त्याविण नाही ।।७।।